MHLA050004332021

दिवाणी कि. अर्ज क्र. ६५/२०२१

**आदेश नि.क्र. ५० वर**

सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–१ नियम–१० प्रमाणे या प्रकरणी हरकतदारास सामील करून घेण्यात यावे म्हणून हरकतदारांनी दाखल केलेला आहे.

२) या अर्जावर अर्जदारातर्फे म्हणणे दिलेले आहे व अर्जास तीव्र विरोध केलेला आहे.

३) दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. हरकतदारातर्फे प्रस्तुत अर्जदार ही मयत रूस्तुम तात्याराव शेळके यांची लग्नाची पत्नी नाही. त्यांची कायदेशीर पत्नी नामे आशाबाई ही सन २०१५ मध्ये मयत झाली. या अर्जदाराशी रूस्तुम शेळके यांनी कधीही विवाह केला नव्हता. त्यामुळे ती त्यांची कायदेशीर वारस होवू शकत नाही. याउलट हरकतदार क्र.१ हा रुस्तुम शेळके यांचा पुतण्या आहे व हरकतदार क्र.२ ही हरकतदार क्र.१ ची आई आहे. ते त्यांचे जवळचे कायदेशीर वारस होतात. त्यामुळे प्रस्तुत अर्जास विरोध करण्यासाठी व हा अर्ज गुणावगुणावर निर्णय करण्यासाठी हरकतदारास गैरअर्जदार म्हणून सामील करण्यात यावे.

४) अर्जदारातर्फे युक्तिवाद व म्हणणे असे की अर्जदार ही रुस्तुम शेळके यांची लग्नाची कायदेशीर पत्नी आहे. त्यामुळे तीच एकमेव वारस आहे. रुस्तुम शेळके हे वकील व्यवसायीक होते. त्यामुळे त्यांनी कायदेशीररित्या अर्जदाराशी विवाह केला होता. सदरचा अर्ज हरकतदारांनी अर्जदारास न्यायापासून वंचीत ठेवण्यासाठी दिलेला असल्याने नामंजूर करावा.

५) मयत रुस्तुम शेळके यांची कायदेशीर वारस असल्याने त्याच्या पश्चातीत लाभ मिळण्यासाठी अर्जदाराने सदरचा अर्ज केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार ही रुस्तुम शेळके यांची कायदेशीर पत्नी नाही व त्यामुळे ती वारस होवू शकत नाही असे कथन केले आहे. हरकतदार हे हिंदू वारसा कायदयाप्रमाणे वर्ग–२ मधील वारस आहेत. हरकतदारांनी जर अर्जदार व रुस्तुम शेळके यांच्या विवाहाबाबत प्रश्न उपस्थीत केला नसता तर अर्जदार ही वर्ग–१ मधील वारस ठरली असती व हरकतदारांना कोणताही हक्क प्राप्त झाला नसता. परंतु अर्जदार व रुस्तुम शेळके यांच्या विवाहाबाबत व अर्जदार ही कायदेशीर पत्नी असल्याबाबत हरकतदारांनी प्रश्न निर्माण केल्याने त्यावर पुरावा घेवून तो सोडवणे आवश्यक आहे. यासाठी हरकतदारांना या प्रकरणी गैरअर्जदार म्हणून सामील करून त्यांचे म्हणणे दाखल होणे व त्याअनुषंगाने दोन्ही बाजुंचे पुरावे विचारात घेणे आवश्यक होणार आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## <u>आदेश</u>

१) हरकतदार क्र.१ व २ यांना या कामी गैरअर्जदार म्हणून सामील करण्यात यावे.

२) अर्जदाराने तशी दुरुस्ती मुदतीत करून घ्यावी.

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक २७/०१/२०२३.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर
जिल्हा लातूर.